# पुणे महानगरपालिका
## * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ४८

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ६/२/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

**विषय क्र. २०६२**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/१/२०१८ ते दि.२२/१/२०१८ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/३८४७ दि. २५/१/२०१८ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २०६३**

मा.सौ.सुनिता वाडेकर यांचे दि. ३१/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ८ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, | | |
| १)सीई२८ए१०६०/एसजे१६-५९, प्रभाग क्र. ८ अ औंध डी.पी.रोड डॉ.आंबेडकर पुतळा सुशोभिकरण करणे | १० लाख | --- |
| २)सीई२८ए१०६०/एसजे१६-६०, प्रभाग क्र. ८ अ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे अश्वारुढ पुतळा बसविणे व विकसित करणे | १० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १)प्रभाग क्र. ८ अ मधील उद्यानांमध्ये विद्युत विषयक कामे करणे | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र. ८ अ मध्ये सुशोभिकरणाचे विद्युत पोल बसविणे व विद्युत विषयक कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. २०६४**

मा.राजू लायगुडे यांचे दि. १/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.३० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, भवन विभागाकडील कामंच्या याद्या, पान क्र. २२०, यादी क्र.एसजे २, प्राथमिक शाळेसाठी नविन इमारत बांधणे, पान क्र. २२३, अ.क्र. १३१, सीई१२अे४२२/एसजे२-१४१, प्रभाग क्र. ३३ ड मध्ये स.नं. १५१/१ (४३२५ स्के.मी.) धायरी याठिकाणी शाळेसाठी आरक्षित असलेल्या जागेवर ई-लर्निंग स्कुल उभारणे | ३० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १)प्रभाग क्र. ३३ ड पोकळे शाळा येथे वॉल कंपाऊंड व तद्नुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र. ३३ ड हायब्लिस परिसरात रस्ते विकसित करणे | --- | १० लाख |
| ३)प्रभाग क्र. ३३ ड डी.एस.के. दळवीवाडी परिसरात रस्ते विषयक कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. २०६५**

मा.जयंत भावे यांचे दि. १/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १३ ड मध्ये विविध ठिकाणी मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेसाठी र.रू.५० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, पान क्र. ७०, अ.क्र. २७, बजेट कोड - झेडई१६बी१०३/एसडी३-८८, प्रभाग क्र. १३ ड गणेशनगर ते टँकर पॉईंट पर्यंतचा ओढा चॅनेलाईज करुन बांधणे | ५० लाख | --- |
| **नवीन सुचविलेले काम** | | |
| प्रभाग क्र. १३ ड मध्ये विविध ठिकाणी मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे | --- | ५० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. २०६६**

मा.जयंत भावे व मा.राजेश बराटे यांचे दि. १/२/२०१८ चे पत्र.

स्थायी समिती ठ.क्र. १८०१ दि. ८/१/२०१८ चा फेरविचार करुन खालीलप्रमाणे मान्यता देण्यात यावी.

प्रभाग क्र. १३ मध्ये विविध ठिकाणी पडीक हद्दीची ठेकेदारी पध्दतीने स्वच्छता करुन घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सद्‌गुरु कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.५३,३२,९०५=२७ पेक्षा ९.९९९९% जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.५८,६६,१९०=४६ पर्यंत झाली असली तरी सदर काम उपलब्ध तरतुद र.रुपये ५३,३२,९०५=२७ पर्यंत टेंडर उघडल्याच्या दिनांक २५/१०/२०१७ पासून काम करून घेणेस व त्यांच्याशी करार करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**विषय क्र. २०६७**

मा.संजय भोसले यांचे दि. १/२/२०१८ चे पत्र.

पुणे शहरात अनेक ठिकाणी पुरातन वास्तु असुन पुणे शहरातील पुरातन वास्तुंचे जतन संवर्धन पुणे महापालिकेच्या वतीने करण्यात येते. येरवडा परिसरातील डेक्कन कॉलेज ही वास्तु सध्या पुरातन काळातील असुन या वास्तुंचे सुध्दा जतन व संवर्धन पुणे महानगरपालिकेच्या वतीने करण्यात यावे. यासाठी सन २०१८-१९ च्या आंदाजपत्रकात योग्य ती तरतुद करण्यात यावी.

**विषय क्र. २०६८**

मा.सौ.मंजुश्री खर्डेकर यांचे दि. १/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १३ क मध्ये महिला बचत गटाच्या विक्री केंद्राकरिता विविध विकास कामे करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक पान क्र. २६६, बजेट कोड-एफई१४ए१०५/एसजी२-१६१ प्रभाग क्र. १३ क मध्ये महिलासांठी स्वच्छतागृह बांधणे. | १० लाख | --- |
| | नवीन सुचविलेले काम | | |
| १ | प्रभाग क्र. १३ क मध्ये महिला बचत गटाच्या विक्री केंद्राकरिता विविध विकास कामे करणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. २०६९**

मा.सौ.मंजुश्री खर्डेकर यांचे दि. १/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १३ क मध्ये मनमोहन सोसायटी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अ.क्र. | अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|---|
| १ | सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक पान क्र. २३२, अ.क्र.१८४ प्रभाग क्र. १३ क मध्ये कर्वेरोड एस.एन.डी.टी. कॉलेज समोर ई बस स्टॉप करणे. | १० लाख | --- |
| | **नवीन सुचविलेले काम** | | |
| १ | प्रभाग क्र. १३ क मध्ये मनमोहन सोसायटी परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २०७०**

मालमत्ता व व्यवस्थापन (भूमी व जिंदगी) कार्यालयाकडील सन २०१५–१६ चे भूमी भाडे रजिस्टर, भवन भाडे रजिस्टर, सदनिका भाडे रजिस्टर, ट्रक टर्मिनन्स भाडे रजिस्टर, शाळा भाडे रजिस्टर, वाहनतळ भाडे रजिस्टर इ. भाडे रजिस्टरची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/९०६ दि. २४/१/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३३ सन २०१७–२०१८ चा विचारासाठी.

## सेवकवर्गाची प्रकरणे

**विषय क्र. २०७१**

पुणे महानगरपालिकेच्या महापालिका सहाय्यक आयुक्त, हडपसर–मुंढवा कार्यालय, आरोग्य विभागाकडील सफाई सेविका श्रीमती लक्ष्मी तुळशीराम खलसे यांचे निलंबन कालावधीस दि. २०/७/२०१७ रोजी पहिली सहामाही पूर्ण झाली असून दुसरी सहामाही दि. २०/१/२०१८ रोजी पूर्ण होत असल्याने सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र.५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/हडपसर–मुंढवा/९१४ दि. २४/१/२०१८ चे पत्र.

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. २०७२**

प्रभाग क्र. ३३ अ सर्व्हे नं. ५१ व ५२ आणि ओढयावर सर्व्हे ६० मध्ये पुल बांधणे, डी.पी.रस्त्यावर कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्वामीराज एंटरप्रायजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४६,७५,१३८/– पेक्षा १७.६०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३८,५२,३१३=७१ पैकी उपलब्ध रकमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९५० दि.३१/०१/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०७३**

पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागासाठी वृक्ष छाटनीसाठी आत्याधुनिक हायड्रॉलिक लॅडर मशिन खरेदी करणे (झाडे कापणे मशिन) (बी–२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.हायटेक सर्व्हिसेस, पुणे यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून १ नग चासीजवर टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे हायड्रॉलिक लॅडर मशिन र.रु.६५,१९,६०१/– पर्यंत जीएसटी व सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्याकामी त्यांचेबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/९५१ दि.३१/०१/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०७४**

कात्रज–सातारारोड गुजरवाडी फाटा ते स.नं. ४५ कात्रज हद्दीपर्यंतचा रस्ता १८ मी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सद्‌गुरु कन्स्ट्रक्शन कं. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.७९,९९,६९१/– पेक्षा २२.८९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.६१,६८,५६१=७३ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९५२ दि.१/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०७५**

पेडेस्ट्रीयन पॉलिसी व अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन प्रमाणे बाजीराव रोड वरील पदपथांची सुधारणा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.एस.एस.साठे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,९९,९९,०६०/- पेक्षा ५.०५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,८९,८९,१०७=४७ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९५३ दि.१/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०७६**

पेडेस्ट्रीयन पॉलिसी व अर्बन स्ट्रीट डिझाईन गाईडलाईन प्रमाणे टिळक रोड वरील पदपथांची सुधारणा करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ज्ञानेश निंबाळकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.१,९९,९९,०६०/- पेक्षा ५.०१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.१,८९,९७,१०७=०९ पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९५४ दि.१/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०७७**

प्रभाग क्र. १४ ड मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.देवकर अर्थमुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,८६७=६० पेक्षा १७.७५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.३२,८९,८९१=१० पर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/९५५ दि.१/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०७८**

प्रभाग क्र. २३ क तुकाईपायथा ते नाल्यापर्यंत मेन रोड २४ इंच ट्रंक लाईन टाकणे व काळेपडख मधील आतील गल्लीत ड्रेनेज लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सदानंद जोशी यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.३९,९९,९८७=४८ पेक्षा ३२.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२७,०३,९९१=५४ पर्यंत अधिक सर्वसाधारण व विशेष भाववाढ सुत्रानुसार येणारी फरकाची जादा रक्कम देणेस अगर कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मलनि:/९५६ दि.१/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०७९**

Supply and installation of 100 TPD mixed waste processing plant at Wadgaon Budruk to produce RDF and Compost and carrying out its Operation and Maintence for the period of 10 years (बी-२ पध्दतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.भुमी ग्रीन एनर्जी यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे असल्याने त्यांचेकडून अ) प्रकल्पाचे मशीनरी उभारणी खर्च र.रुपये ६,७२,१०,२८०/- (सर्वकरांसहित) ब) प्रकल्पाचे देखभाल दुरुस्तीखर्च र.रुपये ३९०/- प्रति मे.टन (सर्वकरांसहित) प्रतिवर्ष १० टक्के वाढ या दराने १० वर्ष कालावधीसाठीचे टेंडर प्राप्त झाले असल्याने त्यांचेकडून काम करुन घेणेस व त्यांचे बरोबर करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/९५७ दि.१/२/२०१८ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. २०८०**

पुणे, पेठ कोथरुड स.नं. २२, हि.नं. ३,८,९ या मिळकतीचे २०.०० मी. डी.पी. रस्त्या करीताच्या आरक्षित असलेल्या मिळकतीची परचेस नोटीस दिल्याने महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/३७४ दि. २०/९/२०१७ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०८१**

पुणे, पेठ बाणेर स.नं.३३, हि.नं.१/४ येथील मिळकतीवरील आरक्षित जागेकरीता जागा मालकामार्फत देण्यात आलेली महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४९ अन्वये दिलेली खरेदी सूचना मे.महाराष्ट्र शासनामार्फत कायम झाल्याने मान्य विकास आराखडयानुसार बाणेर सर्व्हे नंबर ३२ व ३३ मधुन जाणाऱ्या ३० मी. व २४ मी.रस्त्याचे, या दोन्ही रस्त्याच्या जंक्शनपासून ९० मी.दक्षिणेपर्यंतच्या लांबीपर्यंत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शअ/३८८ दि.२२/९/२०१७ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०८२**

मा.प्रमोद उर्फ नाना भानगिरे, मा.सुनिल कांबळे व मा.अविनाश बागवे यांचे दि. २०/६/२०१७ चे पत्र.

पुणे महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने काढलेल्या सी.एफ.सी. च्या निविदेत अनेक त्रुटी आहेत. कमी दर आलेल्या ठेकेदाराला यामध्ये डावलले जात आहे.

त्यामुळे मा.स्थायी समिती ठराव क्र. २२७९ दि. २७/१२/२०१६ चा फेरविचार करावा.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०८३**

पुणे महानगरपालिका हद्दीतील रस्ता दुभाजक, वाहतुक बेटे, उद्याने यांचे सुशोभिकरण, देखभाल, दुरूस्ती व वृक्षारोपण इ. कामाकरिता एक्सप्रेशन ऑफ इंट्रेस्ट (II) अंतर्गत मा. बी.ओ.टी समिती मध्ये मान्य झालेल्या प्रस्तावास मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भ क्र.७, ८ व ९ अन्वये खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उद्यान/८०७ दि. १५/१/२०१८ चे पत्र.

१) मा. बी.ओ. टी समितीने प्रायोजकांच्या प्रस्तावावर घेतलेल्या निणर्यानुसार कार्यवाही करणेस,

२) मा. बी.ओ.टी समितीने मान्य केलेल्या प्रायोजकांच्या प्रस्तावास मान्यता व कामांचे कार्यादेश (वर्कऑर्डर) देणेस,

३) एक्सप्रशेन ऑफ इंट्रेस्ट मधील अटी, शर्तीस व त्यानुसार सुरक्षा अनामत रक्कम स्विकारणेस,

अ. वाहतुक बेट – प्रत्येक ५० चौ.मी क्षेत्रास र.रू ५०,०००/-

ब. रस्तादुभाजक – प्रत्येक ५०० मी . लांबीस र.रू २५,०००/-

क. उद्याने – प्रत्येक १००० चौ.मी क्षेत्रास र.रू १,००,०००/-

ड. वृक्षारोपन – प्रति वृक्ष र.रू ५००/- (वृक्ष संरक्षक पिजंऱ्यासह)

– प्रति चौ.मी क्षेत्रास र.रू ५००/- (वृक्षारोपणासह सुशोभिकरण)

इ. मोठया कुंडया – प्रति कुंडी र.रू २५०/-

४) मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या कामांबाबत प्रायोजकांसमवेत करारनामा करणेस,

५) प्रायोजकास खालीलप्रमाणे त्याचा नावाचा नामफलक लावण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

अ)वाहतूक बेटे :- प्रत्येक ५० चौ.मी.क्षेत्रास १५ X १८ इंच आकाराचा नामफलक

ब)रस्ता दुभाजक :- प्रत्येक १०० मीटर लांबीस १५ X १८ इंच आकाराचा नामफलक

(प्रायोजकांच्या प्रत्येकी ३ नामफलकानंतर उद्यान विभाग,पुणे महानगरपालिकेचा एक नामफलक व त्यावर पर्यावरणाचा संदेश देणारे वाक्य असणे बंधनकारक असणार आहे.)

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.२३/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०८४**

सिंहगड रस्ता-शास्त्री रस्ता-धायरी फाटा ते दांडेकर पुल ते अलका टॉकीज चौक, सारसबाग ते धायरी पुल पर्यंत ॲडग्रेड ब्लॉक बसविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अे.आर.कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७,९९,९९,५७५/- पेक्षा ५.४०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७,५६,७९,५९७=९५ उपलब्ध तरतुदीपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/८५८ दि. १७/१/२०१८ चे पत्र

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३१/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २०८५**

पुणे शहरातील स्वच्छता मोहिमेअंतर्गत पुणे महानगरपालिकेच्या येरवडा येथील बॅच मिक्स प्लान्टमध्ये 'टाकाऊ प्लास्टिक' वापरुन डांबरी मिक्स माल रस्ते तयार करणे करीता डाऊ केमिकल इंटरनॅशनल प्रा.लि. व रुद्र एनव्हायरोंमेंटल इंडिया लि. यांचे सहकार्य घेणेकरिता सामंजस्य करार करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/पथ/८७१ दि. १९/१/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३१/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. २०८६**

पुणे शहरातील सर्व गोठेधारकांना मुंढवा केशवनगर येथे स्थलांतरीत होण्याकरीता दि.३१ डिसेंबर २०१८ पर्यंत मुदत देणे आवश्यक आहे व दरम्यानच्या कालावधीमध्ये गोठेधारकांना प्लॉट देणेसाठी खाली नमुद केलेल्या अटी व शर्ती अथवा धोरणास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९२१ दि.३०/१/२०१८ चे पत्र.

१.गोठेधारकांकडून खाली नमुद केलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणा-या गोठेधारकास क्षेत्रिय कार्यालयाकडील सन २०१५ च्या सर्व्हे नुसार जनावरांच्या संख्येप्रमाणे (१० मोठया जनावरास एक प्लॉट अंदाजे २५०० स्वे.फुट) या तत्वावर प्लॉट देणेस,

२. सदर प्लॉटचे शासकीय मुल्याकंनानुसार भोगवटा मुल्य स्विकारण्यास.

३. मध्यवर्ती शहरातील गोठयांच्या संख्ये इतके प्लॉट राखून ठेवून उर्वरित प्लॉट उपनगरातील पात्र गोठेधारकांना वाटप करणेस,

४. मध्यवर्ती शहरातील गोठे मुंढवा-केशवनगर येथे स्थलांतरीत होण्याच्या दृष्टीने शहरातील गोठे धारकांना दि.३१/१२/२०१८ ही गोठे स्थलांतरीत करण्याकरिता अंतिम तारीख निश्चित करणेस,

५.गोठे स्थलांतरासाठी खालीलप्रमाणे गोठेधारकांची कागदपत्रे ग्राहय धरण्यास.

अ. मा.आरोग्य अधिकारी पुणे महानगरपालिका यांच्या नावे अर्ज.

ब. रेशनींग कार्ड (शिधापत्रिका) ची प्रत.

क. सदर जागेवर सदयःस्थितीत गोठा असल्याचा दिनांक व वेळेसह फोटो व पुणे महानगरपालिकेकडून गोठ्यावर केलेल्या २०१५ पुर्वीचे कारवाईचे कागदपत्रे उदा.मनपा कोर्टातील खटला,सार्वजनिक ठिकाणी घाण केली यासाठी प्रशासकिय शुल्क भरल्याची पावती इ.

ड. महाराष्ट्र शासनाकडील जिल्हा दुग्ध विकास अधिकारी यांचेकडून परवाना अथवा परवाना घेण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र.

इ. संबंधीत क्षेत्रिय कार्यालयाकडील आरोग्य निरीक्षक,वरिष्ठ निरीक्षक, प्रमुख आरोग्य निरिक्षक,क्षेत्रिय वैद्यकिय अधिकारी, महा.सहा.आयुक्त व क्षेत्रिय उपायुक्त यांच्या स्पष्ट अभिप्रायासह स्वाक्षरीचे गोठ्यासाठी जागा देणेबाबत शिफारसपत्र.

६. सरकारी जमिनीवर (नदीपात्र,रस्ता,एसआरए स्कीम इ.) असलेल्या गोठेधारकांचे देखील उपरोक्त अटी व शर्तींची पुर्तता केल्यास मुंढवा-केशवनगर येथे गोठयांसाठी पर्यायी जागा दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने देण्यास.

७. दि.३१/१२/२०१८ पर्यंत मुंढवा केशवनगर येथे स्थलांतरीत न होणा-या गोठे धारकांवर कारवाई करुन तेथील गोठे व्यवसाय बंद करण्यास.

**विषय क्र. २०८७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४३ अन्वये पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी सार्वजनिक वाहनतळ धोरणास (पार्किंग पॉलिसीस) मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/९५८ दि.१/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०८८**

पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व खडकी कॅन्टोन्मेंट बोर्ड इ. भागांच्या हद्दीतून वाहणाऱ्या मुळा, मुठा व मुळा-मुठा या नद्यांचा नदीकाठ विकसन व संवर्धन प्रकल्पास मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/९५९ दि.१/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २०८९**

पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रासाठी ऑप्टीकल फायबर केबल (ओ.एफ.सी.) च्या संबंधित धोरण करणे व राबविण्यासाठी खालील बाबीस मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/९६० दि.१/२/२०१८ चे पत्र.

१) पुणे शहराकरिता इतरांसमवेत वापरात येणाऱ्या (Shared) ऑप्टीकल फायबर जाळयाच्या पायाभूत सुविधेच्या पुणे महानगरपालिकेमार्फत निर्मिती करणेस,

२) शासकीय व खाजगी संस्थाद्वारे त्यांच्या प्रकल्पांसाठी करण्यात येणाऱ्या खोदाई कामांमध्ये ओएफसी टाकण्याच्या समावेशाकरिता खोदकाम (Trenching) मार्गदर्शक तत्व यामधील मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या (परिशिष्ट -१) प्रमाणे सुधारणांना मंजुरी देणेस

३) शहरात २४X७ समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १३९६ किमीचा व इतर प्रकल्पांद्वारे ९०० किमीचा ऑप्टिकल फायबर डक्टस् टाकण्यास मान्यता देणेस,

४) या प्रकल्पांतर्गत निर्माण करण्यात आलेल्या ओएफसी पायाभूत सुविधेचे चालन, देखभाल व उत्पन्न प्राप्त करण्याकरिता पुणे महानगरपालिकेअंतर्गत ऑप्टीकल फायबर इन्फ्रास्ट्रक्चर विभागाची (OFID) स्थापना करण्यास मंजुरी देणेस व मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये दिलेल्या माहितीप्रमाणे कामे त्यांना सुपूर्त करणेस,

५) फायबर इन्फ्रास्ट्रक्चर विभागाकडे (OFID) निर्मित केलेल्या ऑप्टीकल फायबर केबल डक्टस् वर्ग झाल्यानंतर त्यांच्या चालन देखभाल करणेकरिता स्पर्धात्मक निविदेच्या माध्यमातून खाजगी संस्थेची नेमणूक करणेस,

६) या निवड प्रक्रियेत Revenue sharing चे योग्य मॉडेल अवलंब करणेस,

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**